लोकमत

# सौरऊर्जेतून ऊर्जा संवर्धनाचा ध्यास

## जयंत वडतकर, ईसीई इंडिया एनर्जिज प्रा.लि. येथे वसुंधरा दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमरावती:** सौरऊर्जेच्या वापरातून ऊर्जा संवर्धनाचा ध्यास धरा. त्यासाठी शासनाकडून प्राप्त सौरऊर्जा योजनेशी संबंधित विविध उपक्रम, अनुदानाचा लाभ घ्या, असे आवाहन पर्यावरण आणि वन्यजीव अभ्यासक जयंत वडतकर यांनी केले. स्थानिक एमआयडीसी स्थित ईसीई इंडिया एनर्जिज प्रा.लि. येथे जागतिक वसुंधरा दिन कार्यक्रमात ते बोलत होते.

याप्रसंगी पर्यावरण आणि वन्यजीव अभ्यासक श्रीकांत वऱ्हेकर अणि ईसीई इंडियाचे संचालक अनिकेत तोंडारे, श्रीकांत तिखिले उपस्थित होते. 'सोलर मॅन ऑफ इंडिया' म्हणून परिचित डॉ. चेतन सोलंकी व पुणे स्थित स्कूल ऑफ इन्स्पिरेशनल लीडरशिपचे संस्थापक योगेश पवार तसेच ईसीई इंडियाचे संस्थापक व प्रबंध संचालक अमित आरोकर यांनी ऑनलाइन उपस्थिती लावली.




जागतिक वसुंधरा दिन कार्यक्रमात उपक्रमांची रुपरेषा स्पष्ट करताना मान्यवर.

वीज निर्मितीशी संबंधित नैसर्गिक साधनांचा ऱ्हास झपाट्याने होत असल्याने सौर ऊर्जा हाच पर्याय वीज निर्मितीसाठी सध्याच्या घडीला आहे. त्याचा वापर करण्याचे आवाहन मान्यवरांनी केले.

याप्रसंगी संस्थेने स्पर्धा जाहीर केली. यामध्ये पाच ते आठ वर्षे वयोगटाकरिता राष्ट्रीय स्तरावरील चित्रकला स्पर्धा होत आहे. 'सौरऊर्जेद्वारे पृथ्वी वाचवा' हा या स्पर्धेचा विषय आहे. यात प्रथम बक्षीस ५००१ रुपये, द्वितीय बक्षीस ३००१ रुपये व तृतीय २००१ रुपये आहे. याशिवाय 'सौरऊर्जा साक्षरता कार्यक्रम' होणार आहे. यामध्ये या ऊर्जाबद्दल जागरूकता निर्माण करणे व ऊर्जेचा वापर योग्य रीतीने कसा करता येईल, याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. दोन्ही उपक्रम ऑनलाइन पद्धतीने निःशुल्क राबविण्यात येईल.